# राशिभविष्य - सप्टेंबर, २०२०.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**सूचना- प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार, अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम स्थानी याच स्वराशीत मंगळ असून त्यासोबत हर्षलही आहे. या दोन्ही ग्रहांमुळे या राशीच्या मंडळींचा सद्य स्वभाव अतिशय अहंकारी, तापट, हट्टी , लहरी, चंचल, अस्थिर, मानापमान फार असणारा असा झाला असावा, असे वाटते. त्यामुळे अकारण श्रम, दगदग होणे संभवते. या स्वभावदोषांमुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होऊन या राशीच्या नोकरदार मंडळींना असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीची लहान मुले तर अतिशय वांड, खोडकर झाली असण्याची शक्यता दिसते. असे असले तरी हा हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. या राशीच्या तृतीय स्थानी राहू असून हा राहू हरहुन्नरी, पराक्रमी, उदार मनाचा व कर्तृत्व घडविणारा असा असणार आहे. पण त्याच्यामुळे बंधुसुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी कर्क राशीत शुक्र असून तो सुखकारक होईल, ऐषाराम मिळेल. शेतीवाडी असणारांना त्यापासून भरपूर लाभ होईल. हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या पंचम स्थानी जात आहे. त्या स्थानी स्वतः:च्या सिंह राशीत रवि आहेच. हा रवि ग्रह सर्व दृष्टीनी प्रतिकुल असून प्रिय जनांपासून दूरत्व निर्माण करणारा आहे. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्रामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या कलाकार मंडळींना सुखसमाधान देणारा असेल. या राशीच्या षष्ठ स्थानी स्वतः:च्या कन्या राशीत बुध असून महिन्याच्या उत्तरार्धात या षष्ठ स्थानी रवि ग्रह येत आहे. रवि -बुध हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होतील व सुख-शांति -समाधान लाभेल. हा रवि ग्रह दशम या व्यवसाय स्थानास अनुकुल होईल. हितशत्रू पराभूत होतील. पण तो अनारोग्यकारक होणे संभवते. काही मंडळींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करील. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात बुध या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल. या राशीच्या भाग्यस्थानी स्वतः:च्या धनु राशीत वक्री गुरु असून तो महिन्याच्या उत्तरार्धात मार्गी होत आहे. त्यामुळे तो भाग्योदयकारक होईल व अनुकुल संधी प्राप्त होईल. उत्कर्ष होईल व उपासनेद्वारे अध्यात्मिक उन्नती होईल. गुरु सह असलेला केतु संततिसुखात बाधा निर्माण करील. शिवाय त्याच्यामुळे ढोंगी आचरण होणे संभवते. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो लोखंड, कोळसा यांचा व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत असलेला नेपच्यून प्रतिकुल असून त्याच्यामुळे आर्थिक नुकसान, आर्थिक घोटाळे, अर्थप्राप्तीस विलंब होणे, कुमार्गी मित्रांचा त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून श्रीगणेश अथर्वशीर्षाचे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी श्रद्धेने

मनापासून “ओम अश्विनीकुमाराभ्याम नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी “ओम यमाय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहि त्यांनी “ओम अग्नये नमः: “ मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असून हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात पूर्णपणे अशुभ होणार आहेत. त्यांच्यामुळे आर्थिक हानी, मानहानी, भांडणे अशापैकी घटना घडणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. काही मंडळींना जिवावरच्या प्रसंगाला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे राहू-केतू हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात व कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या तृतीय स्थानी कर्क राशीत शुक्र असून तो धनलाभदायक होईल. काही मंडळींना मानाचे स्थान तर काही मंडळींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. काही मंडळींना भूमिलाभ होणेही शक्य आहे. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात येथील शुक्र या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर शेतीवाडी असणारांना लाभदायक होईल. या राशीच्या चतुर्थ-पंचम स्थानी बुधासह असलेला रवि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असून त्याच्यामुळे अनारोग्य, कार्यदिरंगाई, अपघात, प्रिय जनांपासून दुरावा, कौटुंबिक त्रास, संततिसुखात बाधा, नोकरीत वरिष्ठांचा जाच अशा प्रकारचे मनस्ताप सहन करावे लागण्याची शक्यता आहे. पण बुध ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत गेल्यावर अनुकुल होईल व काही मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या धनु या स्वराशीत असलेल्या गुरु ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत असलेला शनि ग्रह सर्वसाधारण्पणे शुभ असून या शनि ग्रहामुळे दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत असलेला नेपच्यून मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना अनुकूल व लाभदायक होईल. इतर व्यावसायिकांच्या व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान करून “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी “ओम अग्नये नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी “ओम ब्रह्माय नमः “ मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ ओम सोम सोमाय नमः:” मंत्राचा श्रद्धेने मनापासून १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या प्रथम स्थानी मिथुन या स्वराशीत असलेला राहू महिन्याच्या उत्तरार्धात व्ययस्थानी वृषभ राशीत जात आहे. महिन्याच्या पूर्वार्धात हा राहू प्रतिकुल असणार असून त्याच्यामुळे काही मंडळींना वातविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींचा अपमान होईल. त्यामुळे मनात सूड भावना निर्माण होईल. जपा. पण हा राहू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व त्यामुळे अर्थलाभ होणे संभवते. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. हितशत्रूपासून रक्षण होईल. पण या राहूमुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा पडण्याची शक्यता आहे. या राशीच्या धनस्थानी कर्क राशीत शुक्र असून त्याच्यामुळे धनलाभ होणे संभवते. तसेच त्याच्यामुळे वैवाहिक व कौटुंबिक जीवनात सुखसमाधान

लाभेल. त्याच्यामुळे सर्व प्रकारचे सुखसमाधान लाभेल. आरोग्य उत्तम राहील, नोकरीत वरिष्ठ खूष होतील. काही मंडळींना बढती, मानाचे स्थान किंवा उच्च पद असे काही मिळण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल. चतुर्थ स्थानी कन्या या स्वराशीत बुधही आहेच. येथील रवीमुळे अनारोग्य, दु:ख, निराशा, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास आदि मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. पण बुध ग्रह अनुकुल असल्याने गृहसौख्य लाभेल. पण धननाश होणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून सोबत केतूही आहे. त्यामुळे काही मंडळींना वैराग्य येणे संभवते. मनस्थिती अस्थिर राहील. पण या स्थानी स्वराशीत असलेल्या गुरुमुळे ज्यांचे प्रेमसंबंध आहेत ते अधिक दृढ होतील. काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. अर्थलाभ होईल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. काहींना प्रवासयोग संभवतो. येथील केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर अधिक अनुकुल होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे अपेक्षाभंग होणे, अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो अध्यात्मात रस असणारांना अनुकुल होईल व उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. तसेच काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी मेष या स्वराशीत मंगळ असून सोबत हर्षलही आहे. या मंगळामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काही मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होईल. शिवाय हर्षलमुळे अर्थलाभ होणेही संभवते. पण इतर गोष्टींबाबत अनिश्चितताच अनुभवास येईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर " श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे व "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. शिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नम:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी " ओम नमः: शंकराय " मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम आदितीये नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत शुक्र असून त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल. तसेच विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुख लाभेल. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या धनस्थानी गेल्यावर कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनलाभ होणेही संभवते. पण या धनस्थानी स्वतः:च्या सिंह राशीत रवि ग्रह आहेच. तो महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल. त्यामुळे वाद, भांडणे होणे, आर्थिक चिंता त्रस्त करणे, वित्तहानी होणे, काही मंडळींना नेत्रविकाराचा आजार होणे संभवते. . महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत गेल्यावर अनुकुल होईल व सर्व सुखसमाधान लाभेल. आरोग्य उत्तम राहील. नोकरीत तुमच्या कामावर वरिष्ठ प्रसन्न होतील. काही मंडळींना उच्च पद मिळू शकेल. काही मंडळींचा सन्मान होईल. पण बुधामुळे शत्रुत्व निर्माण होणे संभवते. हा बुध महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. पण धननाश होणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी स्वतः:च्या धनु राशीत गुरु व केतू असून या गुरुमुळे आरोग्य उत्तम राहील व नोकरचाकरांचे सुखसमाधान लाभेल. महिन्याच्या पूर्वार्धात केतूही अनुकुल होईल व सर्व काही सुखाचेच होईल. पण तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी गेल्यावर उपासना व गूढ अभ्यासास अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वतः:च्या राशीत शनि ग्रह असून त्यामुळे चित्तवृत्ती शांत राहील व विवाहेच्छूचे विवाह

ठरण्यात अडचणी येणे संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो विषभयकारक व जलभयकारक आहे. त्यामुळे जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहू नका. तसेच बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी मेष या स्वतः:च्या राशीत मंगळ असून त्यासोबत हर्षलही आहे. या मंगळामुळे स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. पण हा मंगळ औषधविक्रेते आणि यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. हर्षल ग्रह उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल व नोकरीत बढती मिळेल. या राशीच्या व्ययस्थानी राहू असून या राहूमुळे अर्थलाभ होईल, काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत गेल्यावर संततिविषयक चिंता त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. शिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ओम अदितीये नमः: “ मंत्राचा, पुष्य जन्मनक्षत्र असणारांनी “ओम बृहस्पतये नमः: “ मंत्राचा आणि आश्लेषा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम सर्पाय नमः: “ मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या व्ययस्थानी कर्क राशीत शुक्र असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी सिंह राशीत जात आहे. तेथे स्वराशीत रवि ग्रहही आहेच. हा शुक्र पूर्णपणे अनुकुल व सुखकारक होईल. पण स्वराशीत असलेला रवि ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात धनस्थानी जात आहे. धनस्थानी कन्या या स्वराशीत बुध असून या महिन्याच्या काळात हे रवि -बुध प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, आर्थिक चिंता, वित्तहानी होणे संभवते. काही मंडळींना रक्तविकाराचा आजार तर काहींना नेत्रविकाराचा आजार त्रस्त करील. अशा परिस्थितीत ज्यांना हृदयविकाराचा त्रास आहे त्यांनी मनाचा क्षोभ होऊ देऊ नये. बुधामुळे मित्रद्रोह, कुसंगती, धननाश होणे संभवते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी स्वराशीत गुरु ग्रह असून त्यासोबत केतूही आहे. येथील केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी जात असून हा केतू महिन्याच्या पूर्वार्धात गुरुच्या सान्निध्यात असल्यामुळे अनुकुल होईल व तो आध्यात्मिक उपासना, गूढ अभ्यास करत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. हा केतू चतुर्थ स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे कोणाशी पटणार नाही. कसली तरी चिंता त्रस्त करील. शिवाय त्याच्यामुळे विषभयही असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या पंचम स्थानी असलेला गुरु ग्रह सर्व प्रकारे सुखकारक होईल. अर्थलाभ होईल. प्रेमसंबंध असतील तर ते दृढ होतील. या राशीचे विद्यार्थी अपेक्षित शैक्षणिक प्रगती करू शकतील. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो शत्रुत्व निर्माण करील. गैरसमजुतीने भांडणे लावील, शिवाय अनारोग्यकारकही होईल. पण तो दशम स्थानास पूरक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून या नेपच्यूनमुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनात बाधा, संकटे निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून मंगळामुळे प्रवासात त्रास, मानहानी होणे संभवते. पण हर्षलमुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संशोधन कार्यात

प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या लाभस्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून त्याच्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात संततिसुखात बाधा येणे संभवते. जुगाराचा नाद असणारांना नुकसानकारक होईल. या

राशीच्या अधिकारी मंडळींना अधिकाराचा गैरवापर करून वाम मार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा पूर्ण होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू या राशीच्या दशम स्थानी जात असून यशदायक होईल व त्यामुळे काहींना सत्तास्थान, काहींना अधिकारपद मिळेल तर काहींचा सन्मान होईल. श्रद्धा असेल तर गायत्री उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून गायत्रीमंत्राचा जप करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी “ओम पितराय नमः: “ मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी “ओम भगाय नमः:” मंत्राचा तर ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या लाभस्थानी कर्क राशीत शुक्र असून तो उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व सुखकारक होईल. पण व्यय स्थानी सिंह या स्वराशीत रवि ग्रह असला तरी तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे
मनस्तापदायक घटना घडून नैराश्य येईल. महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि ग्रह या राशीच्या प्रथम स्थानी कन्या राशीत जात आहे. तेथे स्वराशीत बुध ग्रह आहेच. त्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात हे रवि-बुध दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार आहेत. त्यामुळे मनस्थिती चंचल राहील व मनस्ताप अनारोग्य, धननाश, कुसंगती, यांचा त्रास होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून सोबत केतूही आहे. हा केतू पूर्णपणे प्रतिकुल असून त्याच्यामुळे कोणाशी पटणार नाही, कसली तरी चिंता त्रस्त करील. मानसिक दु:ख देईल. शिवाय तो विषभयकारकही आहे. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर थोडा अनुकुल होईल. त्यामुळे आध्यात्मिक उपासना केल्यास मनस्ताप सुसह्य होईल. चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार मनासारखे घडून येतील. पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असल्यामुळे स्वभाव स्वार्थी, संशयी, व्यवहारी होईल. पण बौद्धिक कार्यास अनुकुल होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत
नेपच्यून असून त्याच्यामुळे काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची चिंता त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता त्रस्त करील. काहींना फसवणूक झाल्याचा त्रास सहन करावा लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनारोग्यकारक व धोकादायक होणार आहेत. मंगळामुळे शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. काही मंडळींना मूळव्याधीसारखा आजार त्रस्त करणे संभवते, मंगळ -हर्षल हे दोन्ही ग्रह अपघातभयकारक असून धोकादायक होणार आहेत. हाडमोड होणे संभवते. शिवाय ते जलभयकारक व विषभयकारक होणार आहेत. जपा. या राशीच्या दशम स्थानी राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी जात आहे. हा राहू महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होईल. कोणास अधिकारपद मिळेल तर कोणाचा सन्मान होईल. महिन्याच्या उत्तरार्धात प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ ओम आर्यमे नमः: मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ओम सूर्याय नमः:”

मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या लाभस्थानी सिंह या स्वराशीत रवि असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी जात आहे. त्यामुळे या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होणे संभवते. त्यामुळे सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या व्ययस्थानी कन्या या स्वराशीत बुध ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात तो प्रथम स्थान तुळा राशीत जाईल. पण संपूर्ण महिन्याच्या काळात तो प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. त्यामुळे अपयश, मानहानी, अनारोग्य, धननाश, मित्रद्रोह, कुसंगतीचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या तृतीय स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्यासोबत केतूही आहे. हा केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी जात आहे. त्यामुळे मानसिक दु:ख व आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. तृतीय स्थानी असलेला गुरु ग्रह या राशीच्या लेखकवर्गास अनुकुल होईल व काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल. पण या गुरुमुळे भावंडांपैकी कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्यामुळे दु:ख, नैराश्य, सहन करावे लागेल. तसेच गृहसौख्य हानी होणे संभवते. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अतिशय भावनाशील होईल. पण हा नेपच्यून अध्यात्मास अनुकुल असून उपासनेद्वारे आध्यात्मिक उन्नती करणे शक्य होईल. तसेच हा नेपच्यून गूढ संशोधन कार्यास अनुकुल होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष या स्वराशीत मंगळ व त्यासोबत हर्षलही आहे. हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात माती कालवणारे असून पतिपत्नीपैकी कोणाचे अनारोग्य, दोघांतही वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या भाग्यस्थानी राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे प्रवासयोग येतील. हा राहू दीर्घायुष्यदायक असून काही मंडळींना अचानक धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी कर्क राशीत असलेला शुक्र नोकरीव्यवसायात अडचणी, दु:ख निर्माण होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मन:शक्ती व मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे व झोपी जाण्यापूर्वी श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. तसेच दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या धनस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून सोबत केतुही आहे. हा केतु महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम स्थानी वृश्चिक राशीत जात आहे. या केतूमुळे

महिन्याच्या पूर्वार्धात आर्थिक समस्या निर्माण होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो सुखदायक होईल. पण त्याच्यामुळे अपघात भय आहे. जपा. धनस्थानातील गुरु ग्रहामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. व्यावसायिकांच्या व्यवसायात वाढ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात उत्तम अर्थलाभ होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे काही मंडळींना उत्तम नोकरी मिळेल. काही मंडळींना आवडते उत्तम कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून गैरसमज, घरगुतीबाबत घोटाळे अशापैकी कारणांनी सुखात थोडी बाधा येणे संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष या स्वराशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह मनस्तापदायक व अनारोग्यकारक होणे, मुदतीचा ताप येणे संभवते. तसेच चोरी होणे, अपप्रचाराचा त्रास होणेही संभवते. पण हा हर्षल उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल. पण असे कार्यक्षेत्र असणारांनी सतत अति खोल विचार करत बसू नये. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी जात आहे. हा राहू महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल. या राहूमुळे काही मंडळींना
अचानक धनलाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू प्रतिकुल होईल व त्यामुळे मनात कपटी विचार येणे संभवते. काही मंडळींना वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा उद्युक्त करील. तसेच या राहूमुळे विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी कर्क राशीत शुक्र असून काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होईल. सुखसमाधान लाभेल. काही मंडळींना कीर्ती, प्रसिद्धी मिळणेही शक्य आहे. पण हा शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर थोडा प्रतिकुल होईल. या महिन्याच्या काळात या राशीच्या दशम व लाभस्थानी रवि ग्रह असणार असून लाभस्थानी बुध ग्रहही असणार आहे. हे दोन्ही ग्रह सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. मोठ्या ओळखी होतील. काहींना धन, प्रतिष्ठा प्राप्त होईल. मानसिक, कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. मात्र हा बुध महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या व्यय स्थानी गेल्यावर प्रतिकुल होईल व त्यामुळे अपयश, मानहानी, अनारोग्य होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर “श्रीगणेश अथर्वशीर्षा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याचप्रमाने दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः:” मंत्राचा, अनुराधा जन्मनक्षत्र असणारांनी “ओम मित्राय नमः:” मंत्राचा आणि ज्येष्ठा जन्मनक्षत्र असणारानी “ ओम इंद्राय नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु-** या राशीच्या प्रथम स्थानी याच स्वराशीत गुरु ग्रह असून सोबत केतूही आहे. हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या काळात अनुकुल असले तरी महिन्याच्या उत्तरार्धात हा केतू या राशीच्या व्यय स्थानी वृश्चिक राशीत गेल्यावर स्वभाव लहरी होण्याची शक्यता आहे. गुरु ग्रहामुळे आरोग्य उत्तम राहील, बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. सर्व सुखसमाधान लाभेल. पण या केतूमुळे वाहनधोका असल्यामुळे रस्त्याने सावधानतेने चाला, वाहन नियंत्रित वेगानेच चालवा. वाहन चालवताना मोबाईलवर वार्तालाप करू नका. या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो प्रतिकुल होणार असून

त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात बाधा निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती भावनाशील होईल. त्यामुळे हा नेपच्यून अध्यात्मात रस असणारांना व गूढ संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना अनुकुल व यशदायक होईल. शिवाय या नेपच्यूनमुळे काही मंडळींना जलप्रवासाची तर काहीना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या पंचम स्थानी मेष या स्वराशीत मंगळ व हर्षल असे दोन ग्रह आहेत. येथील मंगळामुळे विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. काही मंडळींना स्थावरविषयक समस्येचा तर काहींना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. पण वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना हा मंगळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून त्याच्यामुळे मनात कपटी विचार उचंबळून येतील. काही मंडळींना वाममार्ग धनप्राप्तीची ओढ लागेल. शिवाय त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात हा राहू या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत गेल्यावर ज्यांचा इतर जातिधर्माच्या मंडळींशी व्यावसायिक संबंध आहे अशांना हा राहू लाभदायक होईल. हितशत्रूवर विजय मिळेल. पण काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या राशीच्या अष्टम स्थानी कर्क राशीत शुक्र ग्रह असून त्याच्यामुळे काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काहींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह या स्वराशीत रवि ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात अष्टम स्थानी असलेला शुक्र भाग्यस्थानी जात आहे. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होणार असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत गेल्यावर अनुकुल होईल. या दशम स्थानी बुध ग्रह आहेच. या बुधामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. धनवृद्धी होईल. मित्रलाभ होईल व सुखसमाधान लाभेल. रवि ग्रह या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना अनुकुल लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी "ओम उदकाय नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम स्थानी याच स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे स्वतः:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. त्याशिवाय नियोजित कार्यात अडथळे येणे, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे दूरत्व झाल्यामुळे अस्वस्थता येणे, नैराश्य येणे संभवते. पण काही मंडळींना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक घोटाळे, आर्थिक संकटे, आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष या स्वराशीत मंगळ आणि हर्षल असून हे दोन्ही ग्रह गैरसमज, अन्य कटकटी, भांडणतंटे असमाधानकारक घटना आदि कारणांनी कौटुंबिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. हर्षलमुळे कशातच सुखसमाधान लाभणार नाही. कोणाशी पटणार नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या

राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे तो दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना तसेच ज्यांचा अन्य जातिधर्माच्या मंडळींशी मैत्रीचे संबंध असणारांना लाभदायक होईल. पण विचार कावेबाज होणे संभवते. तसेच हा राहू संततिसुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या सप्तम स्थानी कर्क राशीत शुक्र असून वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील. या राशीच्या अष्टम स्थानी सिंह या स्वराशीत रवि ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र या स्थानी येत आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह भाग्यस्थानी कन्या राशीत जात आहे. तेथे बुध ग्रह आहेच. या महिन्याच्या संपूर्ण काळात हे रवि-बुध ग्रह प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे इच्छा अपूर्ण राहणे, अनारोग्याचा त्रास होणे, हाती घेतलेल्या कार्यात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे, मानहानी होणे, वडील मंडळींचा विरोध होणे संभवते. सप्तम स्थानी असलेला शुक्र महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर या राशीच्या काही भाग्यवंतांना असचानक धनलाभ होणे संभवते. तसेच भाग्यस्थानी असलेला बुध महिन्याच्या उत्तरार्धात अनुकुल होईल व मानसिक व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या व्ययस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून सोबत केतुही आहेच. हा केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत जात आहे. या गुरुमुळे अध्यात्म व समाजसेवेची आवड असणारांना काळ अनुकुल होईल. प्रवासाचे योग येतील. पण कौटुंबिक जीवनात अडचणी, त्रास , अपेक्षाभंग होणे संभवते. केतूमुळे स्वभाव लहरी होईल. हा केतू लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व मनोनुकुल घटना घडतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याचप्रमाणे दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी " ओम विश्वेदेवाय नमः:" मंत्राचा, श्रवण जन्मनक्षत्र असणारांनी "ओम विष्णवे नमः:" मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी "ओम वसवे नमः: " मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असल्यामुळे या राशीच्या मंडळींची मनस्थिती सध्या अतिशय कोमल झाली असावी असे वाटते. त्यामुळे मानसिक संवेदनाही अति जलद होत असतील. त्यामुळे मानाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहिरे नैराश्य येत असले पाहिजे. या राशीच्या तृतीय स्थानी मेष या स्वराशीत मंगळ असून सोबत हर्षलही आहे. हे दोन्ही ग्रह या महिन्याच्या काळात अनुकुल होणार असून मंगळामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा, कर्तबगारी वाढेल, प्रवासयोग येईल. हर्षलमुळे उच्च बौद्धिक शक्ती, आकलन शक्ति , स्मरणशक्ति प्राप्त होईल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या पंचम स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. पण संततिसुखात बाधा निर्माण करील. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. महिन्याच्या उत्तरार्धात तो अनिष्ट होईल व कौटुंबिक सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी कर्क राशीत शुक्र असूनही कलाक्षेत्रातील गुणवान मंडळींना कलेत अपेक्षित प्रगती करणे शक्य होणार नाही. कलागुण प्रदर्शित करण्यास

संधीच मिळणार नाही. त्यामुळे काही कलाकार व्यसनाधीन होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी सिंह या स्वराशीत रवि ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रह या सप्तम स्थानी येत आहे. महिन्याच्या उत्तरार्धात रवि ग्रह अष्टम स्थानी जात आहे. त्यामुळे या महिन्याच्या संपूर्ण काळात रवि ग्रह प्रतिकुल होणार असून त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. काही मंडळींना नैराश्य येईल. त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होईल. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र ग्रहामुळे सुखशांती मिळेल. महिन्याच्या पूर्वार्धात बुध ग्रह अनुकुल होईल, पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या भाग्यस्थानी जात असून त्यामुळे तो प्रतिकुल होईल. या राशीच्या लाभस्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून सोबत केतूही आहे. हे दोन्ही ग्रह अनुकुल होणार असून त्यांच्यामुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. धनलाभ होईल. वाहनसुख मिळेल. विवाहेच्छूना विवाहयोग येईल. विद्यार्थ्याना शिक्षणात प्रगती करणे शक्य होईल. प्रवासयोग येतील. येथील केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करावेसे वाटेल. पण मनावर ताबा ठेवून त्यांनी तसे काही करू नये. नुकसानच होईल. या राशीच्या व्यय स्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून तो पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्यामुळे सतत मनस्ताप, मानहानी, संकट परंपरा यांना तोंड द्यावे लागेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान करून “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करतांना ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ ओम वसवे नमः” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:” मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा
जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष या स्वराशीत मंगळ असून त्यासोबत हर्षलही आहे. हर्षलमुळे या राशीच्या मंडळींचा स्वभाव अति अस्थिर, चंचल व लहरी असा झाला असावा असे वाटते. त्यामुळे अविचारी विचित्र आचरण होत असेल, अविचाराने खर्च होत असेल. फटकळपणे बोलून समोरच्याचा अपमान केला जात असेल. मंगळामुळे उष्णताविकाराचे आजार त्रस्त करतील. शिवाय आर्थिक समस्याही मनस्ताप देण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मिथुन या स्वराशीत राहू असून तो महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत जात आहे. त्यामुळे हा राहू या महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक सुखाचे दृष्टीने अनिष्ट व अपयशकारक होईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनुकुल होईल व हातून काही कर्तृत्व घडेल. पण तो बंधुसुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. या राशीच्या पंचम स्थानी कर्क राशीत शुक्र असून कलेसाठी कला या दृष्टीने सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेचा आनंद घेता येईल. या राशीच्या षष्ठ स्थानी सिंह या स्वराशीत रवि ग्रह असून महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शुक्र या स्थानी येत आहे. येथील रवि भाग्योदयकारक असून तो दशम स्थानास पूरक होईल. हितशत्रूंचा पराभव होईल व मन:शांती लाभेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर अनारोग्यकारक होईल व त्यामुळे काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. या रविसोबत कन्या या स्वराशीत बुध ग्रहही आहे. पण तो केवळ या राशीच्या व्यापारी मंडळींना अनुकुल होईल. पण त्याच्यामुळे दु:ख, भांडणेच होणे संभवते. पण महिन्याच्या

अखेरच्या सप्ताहात हा बुध या राशीच्या अष्टम स्थानी गेल्यावर अनुकुल होईल व कार्यसिद्धी होऊन सुखसमाधान लाभेल. या राशीच्या दशम स्थानी धनु या स्वराशीत गुरु ग्रह असून त्यासोबत केतूही आहे. या केतूमुळे या राशीच्या काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची तीव्र इच्छा होईल. पण त्यांनी मनावर ताबा ठेवून आहे ती नोकरीच मनापासून करावी. हा केतू महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी गेल्यावर धूर्त, ढोंगी आचरण होणे संभवते. पण या केतूमुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यता आहे. पण या राशीच्या दशम स्थानी स्वराशीत असलेला गुरु ग्रह बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. नोकरीत वरिष्ठ कामावर प्रसन्न होतील. काही भाग्यवंतांचा मानसन्मान होणेही संभवते. काही मंडळींना नवे आवडते कार्यक्षेत्रही मिळू शकेल. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत शनि ग्रह असून त्याच्यामुळे अर्थलाभ होणे संभवते. पण या शनिमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या व्यय स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे चिंता, मानसिक व्यग्रता, नैराश्य येणे संभवते. पण हा नेपच्यून गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर ““बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ ओम अहिर्बुध्न्याय नमः: “ मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” मंत्राचा मनापासून श्रद्धेने १०८ वेळा जप करावा.

=====ooooo0ooooo=====